**एल.ए.आर.क्र. ३२०/२०२१**

**CNRNoMHOS**120003342021

**बिभीषण वि. महाराष्ट्र शासन**

**नि.क्र. १० खालील आदेश**

(आदेश दि.१६/०३/२०२२)

०१. नि.क्र. १० वरील अर्ज हा प्रकरणातील मयत अर्जदार बिभीषण श्रीपती काळे यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होणेबाबतचा आहे. अर्जातील कथनाप्रमाणे प्रस्तुत अर्जातील अर्जदार बिभीषण श्रीपती काळे हे दि.२६/१२/२०१८ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदाराने मयत अर्जदार बिभीषण श्रीपती काळे यांचे वारस हे वेळेत रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते. परंतु, अर्जदार हे कामानिमीत्त मुंबई (ठाणे) येथे राहत असल्यामुळे व कोवीड–१९ च्या लॉकडाऊनमुळे गांवी मौजे पाडोळी, ता. भूम येथे येजा करता आले नाही त्यामुळे अर्जदारास प्रस्तुत प्रकरणाची माहिती होऊ शकली नाही. त्यामुळे वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर झालेला आहे. त्यामुळे मयत अर्जदार बिभीषण श्रीपती काळे यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करावा अशी विनंती त्यांनी अर्जाद्वारे केलेली आहे.

०२. मी सदर अर्जावर युक्तीवाद ऐकलेला आहे.

०४. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार बिभीषण श्रीपती काळे हे दि.२६/१२/२०१८ रोजी मयत झालेले आहेत, तर विलंब माफीचा अर्ज दि.२३/०२/२०२२ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. अर्जासोबत मयत अर्जदार बिभीषण श्रीपती काळे यांचे मृत्यु प्रमाणपत्राची प्रत दाखल केलेली आहे. सदरचे प्रकरण हे संपादीत जमिनीचा मावेजा वाटपाबाबतचे आहे. त्यामुळे मयत अर्जदार बिभीषण श्रीपती काळे यांचे वारसांचे हक्क व हितसंबंध अर्जात समाविष्ट असल्यामुळे झालेला विलंब माफ होणे आवश्यक आहे. परिणामतः खालील आदेश.

**आदेश**

०१. नि. क्र. १० खालील अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

Digitally signed by VARSHA BALVANTRAO PATIL
Date: 2022.03.16 03:38:49 +0530

दिनांक – १६/०३/२०२२ (सौ.व्ही. बी. पाटील )

सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. V. B. Patil,<br>Jt. Civil Judge, Senior Division,<br>Bhoom, District-Osmanabad. |
| Date | --- | 16/03/2022 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 16/03/2022 |
| Order uploaded on | --- | 16/03/2022 |